# स्फूट लेख

लेखक
हिंदुहृदयसम्राट स्वातंत्र्यवीर
**विनायक दामोदर सावरकर**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**स्फूट लेख : विनायक दामोदर सावरकर**

© **हिमानी सावरकर**

**जनआवृत्ती संकल्पना : श्री. नानासाहेब गोडसे**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**दुसरी आवृत्ती**
मे, २०१२ - २००० प्रती

**किंमत**
जनआवृत्ती रुपये १००/-

# स्फूट लेख

# स्फूट लेख

## हिंदी क्रांतिकारकांची परदेशीय चळवळ

### (पूर्वार्ध)

अेखाद्या होतकरू नटाचे नांव जितके लोकांच्या तोंडी असते, तितके देखील त्या देशदेशांतरी त्याच्याच स्वातंत्र्यासाठी प्राण संकटात घालून झगडत, झुंजत, सहत, भटकत असलेल्या हिंदी निर्वासितांचे नांव कोणाच्या तोंडी नसते; अितकेंच नव्हे तर क्रांतिकारकांचा संपूर्ण कार्यक्रम पुढे नसता आणि जो तुटपुंजा कार्यक्रम त्यांच्यापुढे असतो त्याचे मर्मही कळण्याअितके अितिहासाचे आणि राजकारणाचे प्रत्यक्ष ज्ञान नसता हिंदी राज्यक्रांतिकारक संस्थांवर दोषारोपण करण्याचा लहान तोंडी मोठा घास घेणारे निरर्गल नवशिकेही कुठेकुठे आढळून येतात. ही दु:खद स्थिती किंचित् तरी बदलावी म्हणून 'हिंदी क्रांतिकारकांचा अैतिहासिक अुल्लेख' या नावाचा लाला लजपतराय यांच्या 'पीपल' पत्रांत प्रसिद्ध झालेला खालील लेख आम्ही अिंग्रजीतून मराठीत भाषांतरीत करीत आहोत. हा मूळ लेख व्याख्यानरुपाने बर्लिन येथे अ‍ॅग्नेस मेडले नावाच्या अेका अमेरिकन विदूषीने वाचला होता. ह्या विदुषी चीनच्या राज्यक्रांतीत, हिंदी राज्यक्रांतीसहि शक्य तो पाठिंबा आणि सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न बरीच वर्षे करीत आहेत. या प्रयत्नांतीलच अेक प्रयत्न म्हणून जर्मनीत असणाऱ्या तरुण चिनी विद्यार्थ्यांस हिंदी राज्यक्रांतीच्या आणि स्वातंत्र्यप्राप्तर्थ्य चालत आलेल्या लढ्याच्या अितिहासाचे सांगता येअील तितके तरी स्वरुप आणि वर्णन सांगावे यास्तव हिंदुस्थानच्या अेका थोर देशभक्त निर्वासिताशी अेकदा

विवाहबद्ध झालेल्या आणि अद्यापि हिंदुस्थानवर मातृभूमीप्रमाणें प्रेम करणाऱ्या वरील अमेरिकन विदुषीनें हे व्याख्यान चिनी विद्यार्थ्यांसमोर जुलै १९२७ मध्ये दिलेहोते, त्यावरून त्याचे विशिष्ट महत्त्वही वाचकांच्या ध्यानी येअील.''

**ॲग्नेस मेडले या विदुषीच्या भाषणाचा लालाजींच्या 'People' पत्रांतील अुतारा :**

या अितिहासाला साधारणत: अिसवी सन १८५७ मधील हिंदी स्वातंत्र्ययुद्धापासून सुरुवात करण्यास हरकत नाही. यावर्षी अिंग्लंडच्या दास्यत्वाचे जूं फेकून देण्याचा हिंदी राष्ट्राने प्रयत्न केला, परंतु त्यात त्याला यश आले नाही. त्यावेळी हिंदी राष्ट्रीय पुढाऱ्यांचे प्रतिनिधी परदेशांत गेले. त्यांनी फ्रान्स व रशिया यांच्याशी संबंध जोडण्याचा प्रयत्न केला; परंतु तो सिद्धीस गेला नाही. त्या कालापासून साधारणत: स्वातंत्र्याकरता करण्यात आलेल्या प्रत्येक राजकीय चळवळीतून अशी माणसें बाहेर पडली की, त्यांना हिंदुस्थानात अज्ञातवासात रहावें लागले, किंवा या परदेशाचा आश्रय करावा लागला. बहुधा ही माणसें म्हणजे ध्येयवादी व करारी अशा व्यक्ति असून जर त्यांनी हिंदुस्थानात अुघड अुघड राजकीय चळवळी केल्या असल्या तर त्यांना कारागृहांत बद्ध व्हावे लागले असते किंवा ते फांशी तरी गेले असते. मी या परदेशी राहिलेल्या गृहस्थांविषयी विशेषत: माहिति सांगणार आहे. कारण त्या व्यक्ति महत्त्वाच्या होत्या. हिंदी क्रांतिकारकांच्या चळवळीचे मध्यवर्ती केंद्र 'परदेशस्थ क्रांतिकारक' हे बरेच वर्षेपर्यंत राहिले. याचें अुत्तरदायित्व ब्रिटिशांच्या अन्यायी नि हिडिस राज्यपद्धतीवर, की ज्यामुळे क्रांतीची चळवळ हिंदुस्थानांत अशक्य झाली, मुख्यत्वेंकरून आहे.

**क्रांतिकारक विचारांचे केंद्र परदेशांत राहिले**

स्वत: हिंदुस्थानांत अशा कांही व्यक्ति होत्या की, ज्यांनी आपले सर्व आयुष्य क्रांतीला वाहिलेले होते. यापैकी लोकमान्य टिळक हे होत. परंतु त्यांच्या आयुष्यांतील महत्त्वाचा भाग कारावासांत गेला. या कारणामुळे युद्धसामग्रीपर्यंत क्रांतिकारकांच्या विचारांची वा चळवळीची मुख्यकेंद्र परदेशस्थ निर्वासित हिंदी लोक हा होता. मात्र त्यांच्याच विचारांनी त्यांच्याच चळवळींनी हिंदी तरुणांच्या



मनांत स्वातंत्र्यविषयक भावना अुद्दिपीत राहिल्या होत्या. युरोपीय युद्धसमाप्तीपर्यंत हिंदुस्थान राजकीयच नव्हे, आर्थिक नव्हे, परंतु मानसिक दास्यातही होता; आजमितीपर्यंत तो तसाच आहे. हिंदी पुढाऱ्यांपैकी बहुतेकजण आजदेखील अिंग्लंड वा अन्य अेखादा ब्रिटिश राजकीय पक्ष यांच्या सहाय्याच्या अपेक्षेत असतात. परंतु गेली कांही दशकेपर्यंत परदेशस्थ हिंदी निर्वासित लोक व कांही हिंदुस्थानांतील लोक या धोरणाचा ब्रिटिश राज्यपद्धतीप्रमाणेच तीव्र निषेध करीत होते. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर परदेशीय सरकारशी संधान बांधण्याचा पहिला प्रयत्न महाराजा दिलीपसिंग यांनी अि.स.१८८४ साली केला. ते लहानपणापासून अिंग्लंडात वाढले होते तरीदेखील हिंदुस्थानची दास्यप्रवण व लज्जास्पद स्थिती विसरले नव्हते. त्यांनी ब्रिटिशांचे राज्य अुलथून पाडण्यासाठी रशियाचे गुप्त सहाय्य मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु तो व्यर्थ गेला. यानंतर याच प्रकारचे हिंदुस्थानच्या सीमेवर कांही प्रयत्न करण्यात आले. परंतु त्याची मला निश्चित माहिती नाही.' (पंजाबातील श्री. रामसिंग कुका, महाराष्ट्रीय वासुदेव बळवंत फडके, प्रभृतींचे आंदोलन सांगण्याचे व्याख्यात्यांकडून चुकीने सोडले गेले आहे.)

**अजितसिंग आणि अंबाप्रसाद**

राजकीय निर्वासितांपैकी अगदी पहिला संघ दोन किंवा तीन व्यक्तिंचा होता.सुमारे २० वर्षापूर्वी ह्या व्यक्ति अिरणांत पळून गेल्या व त्या ठिकाणी आपल्या चळवळीचें केंद्रस्थान स्थापण्याचा त्यांनी प्रयत्न केला. अिरणांतील त्यांची चळवळ दोन प्रकारची होती. प्रथमत: त्यांनी क्रांतिकारक वृत्तपत्रे प्रसिद्ध केली आणि कॉलेजांतील विद्यार्थी व सैन्यांतील शिपाअी यांच्या हाती पडावी अशा पद्धतीने हिंदुस्थानांत पाठवून दिली. दुसरें त्यांनी अिराणी प्राजक्त चळवळीशी आपणांला आत्मसात करून घेतले. शाळागृहे बांधली, वृत्तपत्रे काढली आणि तरुण अिराणी पिढीला सुशिक्षित केले. अिराणी प्राजक्त चळवळ अिंग्लिशांविरुद्ध होती आणि तींत भाग घ्यावा हे सहजच होते. त्या विरहित त्या कल्पना त्यांना स्वत:लाच पसंत पडल्या होत्या.

यापैकी प्रमुख पंजाबातील सुफी अंबाप्रसाद आणि अजितसिंग हे होते. या दोघांनाही हिंदुस्थानांत असतांना सरकारपासून बराच अुपद्रव सहन करावा

लागला होता. सुफी हा पर्शियन शिक्षक आणि संघटक म्हणून प्रसिद्धिस आला. कांही वर्षांनंतर महंमद अल्ली हे मुसलमानी नांव धारण केलेला अेक मराठा अि.स.१९०५ मध्ये अिराणी बंड अुद्‌भवले त्यावेळी ज्या सैन्याने तेहरान हस्तगत केले त्यांतील अेका तुकडीचा सेनापती होता. या संघांत महाराष्ट्रांतील सुद्धां कांही लोक होते. परंतु त्यांची नांवे सांगण्याची आवश्यकता नाही. अि.स.१९०५ ते १९११ मधील राजकीय चळवळीच्या योगानें.

**राज्यक्रांतिकारक निर्वासित**

हा अेक नवीनच वर्ग अुत्पन्न झाला व त्यांनी क्रांतिचळवळीचें केंद्र युरोप, अमेरिका, चीन व जपान या देशांत स्थापण्याचा प्रयत्न केला. अि.स.१९०४ मध्ये जपाननें रशियासारख्या युरोपियन राष्ट्राचा पराभव केला. या गोष्टीचा परिणाम हिंदुस्थानावर विशेष करून तरुण वर्गावर फार मोठा झाला. या गोष्टीने त्यांना हे स्पष्ट कळून आले की, युरोपीय राष्ट्राचा अेशियाटिक राष्ट्र पराभव करून शकते आणि पारतंत्र्य आशियांतील राष्ट्रांच्या भालावर लिहिलेले नसून, तो फक्त शस्त्रे, संघ अित्यादी गोष्टींवर अवलंबून असणारा अेक प्रश्न होता. अि.स.१९०५ नंतर जे कट आणि जी भयंकर चळवळ चालू झाली, त्याचे अितरही अनेक राजकीय व आर्थिक कारणाबरोबर हे महत्त्वाचे कारण होते. सर्व जगासंबंधाने अि.स. १९०५ हे वर्ष अैतिहासिक महत्त्वाचे होते. याचवर्षी रशिया, अिराण, मेक्झिको, आयर्लंड, युनायटेड स्टेट्समध्ये हिंदी क्रांतिकारकांची अेक संस्था स्थापली गेली आणि याच वर्षी हिंदुस्थानातील भीतिप्रद चळवळीला सुरुवात झाली.

या स्थळी ही गोष्ट लक्षांत बाळगणें अवश्य आहे कीं, ज्यावेळी मी ‘क्रांती’ आणि ‘क्रांतिकारक’ हे शब्द वापरले त्यावेळी त्यांचा अुद्दिष्ट अर्थ ‘राष्ट्रीय क्रांती’ हाच मात्र आहे. निव्वळ शाब्दिक अर्थाने, हिंदुस्थानांतील भयप्रद वा राष्ट्रीय चळवळींना क्रांतिकारक चळवळी म्हणता येणे शक्य नाही. युरोपमध्ये ‘क्रांती’ व ‘क्रांतिकारक’ या शब्दांना आर्थिक, सामाजिक महत्त्व आलेले आहे.

परंतु युरोपीय युद्धान्तापर्यंत व रशियांतील क्रांती विजयी होअीपर्यंत हिंदी निर्वासितांत फक्त पांच किंवा सहाच ‘समाजसत्तावादी’ (Socialist) होते.



**विद्यार्थ्यांची बहुसंख्या**

१९०५ नंतरच्या काळांत बरेच हिंदी लोक चीन, जपान, अमेरिका, फ्रान्स व युरोपातील अितर देश यामध्ये निर्वासनांत रहात असलेले आढळून येतात. अुदारणार्थ फ्रान्स नि अिंग्लंड या देशात पुष्कळ व्यक्ती अशा होत्या की, ज्या हिंदी स्वातंत्र्यार्थ यत्न केल्यामुळे निर्वासित बनल्या या दोन्ही देशात गुप्त हिंदी क्रांतिकारकांचे फार मोठे संघ होते. यापैकी बहुतेक विद्यार्थी होते. हिंदुस्थानांतील प्रौढ वर्ग अजूनही अिंग्लंडजवळ दीनपणें भाकरीच्या तुकड्यांकरिता याचना करीत होता. परंतु तरुण वर्ग याचना वृत्तीने संतुष्ट नव्हता. आपल्या गुप्त संघटनाद्वारा त्यांनी द्रव्य जमविले, गुप्त क्रांतिकारक वृत्तपत्रे प्रसिद्ध केली आणि हिंदुस्थानातील विश्व विद्यालयें असलेल्या नगरांतून गुप्तपणें प्रसृत केली. यापैकी अेका वृत्तपत्राचे नांव ‘तलवार’ असून (ते ‘अभिनव भारताचे’ मुखपत्र होते.) ते निघाल्यास आज १५ ते २० वर्षे झाली; परंतु ते आजही वाचले असतां त्यांतील कांही लेख आश्चर्य अुत्पन्न केल्यावाचून रहात नाहीत. आंतरराष्ट्रीय राजकारण व आर्थिक विकास यासंबंधीचे या पत्राचे ज्ञान अितके अुत्कृष्ट होते की, कोणालाही असे म्हटल्यावाचून रहावत नाही की, जर आंतरराष्ट्रीय कार्यासंबंधी हिंदुस्तान परदेशस्थ देशभक्तावर अवलंबून राहिले असते, तर ते आज निश्चयानें पारतंत्र्यात रहाते ना. अुदाहरणार्थ, १९०९ या वर्षी या पत्रांत अेक लेख होता. त्यांत अिंग्लंड व जर्मनी यामधील वाढत्या कलहाची मीमांसा स्पष्टीकरण करण्यांत आले होते की, भविष्यकाळांत या दोन राष्ट्रांत युद्ध निश्चयाने होणार व ही संधी हिंदुस्थानला स्वातंत्र्यसिद्धीसाठी यत्न करण्यास अुत्तम आहे. हा लेख म्हणजे युरोपमधील तत्कालीन राजकीय व आर्थिक विकासाचें सुस्पष्ट व जोरदार विवरण आहे. अशा प्रकारचे ज्यांचे ज्ञान व सामर्थ्य मोठे आहे, अशा क्रांतिकारक लोकांवर विश्वास न टाकल्यामुळें व त्यांच्याबरोबर कार्य न केल्यामुळे हिंदुस्थानची कल्पनातीत हानी झाली आहे.’

**स्वातंत्र्ययुद्धाचा पहिला अितिहास**

‘अिंग्लंडमधील हिंदी संघाने १८५७ मधील स्वातंत्र्ययुद्धाचा हिंदी दृष्टीनें लिहीलेला पहिलाच अितिहास प्रकाशित केला तो हॉलंडमध्ये गुप्तपणें प्रकाशित

करण्यांत आला. कारण सत्याचे ज्ञान ब्रिटिशांना आणि ते प्रसिद्ध करणाऱ्यांना धोक्याचे असते. हिंदुस्थान व अिंग्लंड या दोन्ही देशांत अर्थातच गुप्तपणें त्याचा प्रसार फार मोठ्या प्रमाणावर झाला. या ग्रंथाचे कर्तृत्व अिंग्लंडमधील हिंदी संघाचे प्रमुख श्री. विनायकराव सावरकर यांच्याकडे होते.आज त्या पुस्तकाला वाङ्मयीन व अैतिहासिक संशोधनात्मक मोठे मूल्य आहे. हिंदुस्थानचे जन्मसिद्ध शत्रू सर व्हॅलेन्टाअिन चिरोल यांनी या पुस्तकांविषयी आपला अभिप्राय दर्शित केला आहे. त्यांनी असे अुद्‌गार काढले आहेत की, ‘या पुस्तकांत संशोधन व अैतिहासिक गोष्टींची विपर्यस्तता, अतिशयित वाङ्मयीन सामर्थ्य व अतिशयित रानटी द्वेष या गोष्टींचे अेकमिलन आढळते आणि थॉमसनसाहेबांनी आपल्या ‘अंडर साअीड ऑफ धि मेडल’ नामक पुस्तकांत श्री. सावरकरांच्या मेंदूवर त्यावेळी अेका वेडपणाचे प्राबल्य होते आणि असे पुस्तक जप्त होणे अिष्ट असल्याकारणानें ते करण्यांत आले, असे म्हटले आहे. परंतु अशा अिंग्लिश गृहस्थांनी केलेली निंदा आम्ही स्तुतीच समजतो. ज्याला ते विरोध करतात ते खरेंच असले पाहिजे. ज्याच्या विरोधास आम्ही सत्याचे निदर्शक समजतो, हिंदी स्वातंत्र्ययुद्धाचा अत्यंत विपर्यस्त असा अिंग्लिश गृहस्थांनी लिहीलेला व हल्ली शाळा व कॉलेज यांमधून शिकविण्यांत येत असलेला अितिहास हिंदी वाचकांस १८५७ वर्षाचे हिंदी स्वातंत्र्यार्थ प्रयत्न करणारासंबंधी लाज वाटावयास लावतो. अितकेच नव्हे, तर या हुतात्म्यांना ‘राज्यद्रोही’ समजण्याकडे त्यांचा कल वळवितो. हिंदुस्थानातील सर्व निर्वासितांचा व क्रांतिकारकांचा हाच महान अपवाद आहे की त्यांनी आपल्या देशबांधवांना कोणत्याही स्वरुपातील गुलामगिरींचा द्वेष करण्यास व हिंदी स्वातंत्र्यार्थ यत्न करण्यास शिकविले.

अिंग्लंडातील हिंदी क्रांतिकारक संघाचे सदस्य सर्व विश्वविद्यालयांतून होते. ब्रिटिश सरकारचा असा त्यांजवर आरोप आहे की, त्यांनी पिस्तुले खरेदी केली व हिंदुस्थानातील भयप्रद चळवळीला साह्य करण्याच्या अुद्देशानें ती हिंदुस्थानांत घुसडून दिली. कदाचित् त्यांनी तसे केलेही असेल. त्याच्यापूर्वी अमेरिकन क्रांतिकारकांनी तेच केले होते. अेवढेच अंतर की, त्यांनी ती मोठ्या



प्रमाणावर फ्रान्समधून हस्तगत केली व अमेरिकेतील क्रांतिकारकांकडे पाठवून दिली. अंतर केवळ प्रमाणाचें होते.

**मदनलाल धिंग्रा**

१ जुलै १९०९ या दिवशी लंडनमधील हिंदी (अभिनव भारत) क्रांतिकारक संघापैकी अेक सभासद श्री. मदनलाल धिंग्रा यानें हिंदी विद्यार्थ्यांविरुद्ध अुपयोगिण्यांत येत असलेल्या ब्रिटिश गुप्त हेरांचा मुख्य ना. कर्झन वायली यांना लंडन नगरात ठार केले. धिंग्राला १७ ऑगस्ट रोजी लंडनमध्ये फाशी देण्यांत आली आणि त्याच्या देशबांधवांनी त्याच्या अंत्यविधीसंबंधी केलेली मागणी नाकारून त्याला कारागृहाच्या आवारात पुरण्यांत आले. तो अुन्नत शिर असा वधस्तंभाकडे गेला आणि त्याला साह्य करण्यांस पुढे आलेल्या लोकांशी हस्तांदोलन करून आपणाला मृत्यूचे मळीच भय वाटत नसल्याचे त्यानें सांगितले. वधस्थानाजवळ अुभा असताना त्याला कांही सांगावयाचे होते काय अशी पृच्छा करण्यांत येतांत तो ‘वंदे मातरम्’ असे गर्जला ! केवळ अेकाच हिंदी गृहस्थाला अुपस्थित असण्याची परवानगी दिलेली होती व तो ब्रिटिश सरकारचा हेर होता. परंतु धिंग्राचे मनोधैर्य पाहून त्याच्यावरही विलक्षण परिणाम झाला.

यानंतर ब्रिटिश सरकारने लंडनमधील हिंदी लोकांविरुद्ध मोहीम सुरु केली. पुष्कळ लोकांना फ्रान्समध्ये पळून जावे लागले व ते आजही युरापांतच आहेत. सावरकरांना अिंग्लंडात पकडण्यात आले व हिंदुस्थानमध्ये चौकशीसाठी पाठविण्यांत आले. बोट मार्सेल्स बंदरांत असता त्यांनी मोठ्या धाडसाने व कौशल्याने आपली सुटका करून गेतली व ते फ्रान्सच्या किनाऱ्यावर पोहून गेले. आंतरराष्ट्रीय कायद्यान्वये (निर्बंधानें) त्यांना आश्रयाचा अधिकार होता. परंतु ब्रिटिशांनी त्यांचा पाठलाग करून त्यांना पकडले आणि आंतरराष्ट्रीय निर्बंधाचा भंग करून हिंदुस्थानचा सैबिरियाच अशा अंदमान बेटात दोन जन्मठेपींची शिक्षा दिली. ट्यूबरक्यूलॉसिसचा अतिशय अुपद्रव झाल्या कारणानें त्यांना दोन वर्षांपूर्वी मुक्त करण्यांत आले असून ते हल्ली मुंबअी अिलाख्यांतील रत्नागिरी नावाच्या बंदरात दृष्टीबंदीत आहेत, सावरकरांच्या सहकाऱ्यांपैकी ना. व्ही. व्ही. अेस्. अय्यर नंतर पाँडेचरी (फ्रेच हिंदुस्थान) येथे रहात असत.